# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः01.10.2024** **वारःमंगळवार**

1. ग्रामसेवक, कोतवालांच्या मानधनात वाढ करण्याला राज्य मंत्रीमंडळाची मंजूरी
2. देशी गायीला राज्यमाता गोमाता दर्जा देण्याचाही निर्णय
3. ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर
4. कानपूर क्रिकेट कसोटीमध्ये भारताची पहिल्या डावानंतर 52 धावांची आघाडी आणि
5. यंदाच्या पावसाळ्यात राज्यातल्या बहुतांश जिल्ह्यांत सरासरीइतका किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस

**<u>मंत्रीमंडळ निर्णय</u>**

ग्राम सेवक, कोतवाल आणि गृह रक्षक दलाच्या जवानांच्या मानधनात वाढ करण्याला काल राज्य मंत्रीमंडळानं मान्यता दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. कोतवालांच्या मानधनात 10 टक्के वाढ करण्यात आली असून त्यांच्यासाठी अनुकंपा तत्त्वावरची पदभरती देखील लागू करण्यात आली आहे. ग्रामसेवकांना 7 हजार रुपये मानधन तसंच प्रोत्साहन भत्ता देण्यात येईल.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या ग्रॅच्युइटीच्या मर्यादेत वाढ करुन ते 20 लाखांपर्यंत करण्यात येईल. राज्यातल्या गोशाळांना देशी गाईंच्या पालनासाठी प्रति दिन, प्रति गाय 50 रुपये अनुदान देण्याचा निर्णयही मंत्रीमंडळानं घेतला. अत्यल्प उत्पन्न असलेल्या गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडून ऑनलाईन पद्धतीनं हा निधी देण्यात येईल. देशी गाई शेतकऱ्यांसाठी वरदान असून त्यांना राज्यमाता हा दर्जा देण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं.

विशेष शिक्षकांच्या 4 हजार 860 पदांच्या भरतीला आणि निवृत्त कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या लाभात वाढ करण्यालाही मंत्रीमंडळानं मंजूरी दिली. मराठा आरक्षणासंदर्भातला न्यायमूर्ती संदीप शिंदें समितीचा दुसरा आणि तिसरा अहवाल मंत्रीमंडळानं स्वीकारला. त्याचबरोबर सोनार समाजासाठी संत नरहरी आर्थिक विकास महामंडळ आणि आर्य वैश्य समाजासाठीच्या श्री वासावी कन्यका आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याला बैठकीत मंजूरी देण्यात आली.

ठाण्यातल्या वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या सुधारित आराखड्याला, ऑरेन्ज गेट ते मरीन ड्राइव्ह आणि ठाणे ते बोरीवली भुयारी मार्गालाही मंत्रीमंडळानं मान्यता दिली. आकुर्डी, मालाड आणि वाढवण इथं राष्ट्रीय क्रीडा संकुल उभारण्यासाठी भारतीय क्रीडा प्राधिकरणाला जमीन उपलब्ध करुन देण्यात येईल. नाशिकचं वैद्यकीय पदवी महाविद्यालय आणि रुग्णालय राज्य सरकारच्या ताब्यात घेण्याचा तसंच राज्यातील आयुर्वेद, युनानी महाविद्यालयातील पदभरतीसाठी निवड समिती स्थापन करण्याचा निर्णयही काल मंत्रीमंडळानं घेतला.

**<u>शेतकरी अनुदान</u>**

राज्यातल्या कापूस, आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना गेल्या वर्षीच्या खरीप हंगामासाठीचं अनुदान वितरित करण्याला काल सुरुवात झाली. राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीदरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीनं शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अनुदान वितरणाला सुरुवात झाली. पहिल्या टप्प्यात 49 लाख 50 हजार शेतकऱ्यांच्या खात्यांत हे अनुदान जमा केलं जाणार आहे.

**<u>हर घर दुर्गा</u>**

देशातल्या तरुणींमध्ये अन्याय आणि अत्याचाराचा प्रतिकार करण्याची क्षमता वाढवण्यासाठी, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी हर घर दुर्गा हे अभियान मोलाची भूमिका बजावेल; असा विश्वास लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी काल मुंबईत व्यक्त केला. कुर्ला इथल्या शासकीय औद्योगिक संस्थेमध्ये हर घर दुर्गा या अभियानाची सुरुवात बिर्ला यांच्या उपस्थितीत करण्यात आली; त्यावेळी ते बोलत होते. या अभियानाच्या माध्यमातून शासकीय औद्योगिक संस्थांमधल्या तरुणींना स्वरक्षणाचं मोफत प्रशिक्षण देणात येणार आहे.

**<u>दादासाहेब फाळके पुरस्कार</u>**

ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल समाज माध्यमावरच्या संदेशाद्वारे ही माहिती दिली. मिथुन चक्रवर्ती यांचं आयुष्य संघर्ष आणि यश यांचा मिलाफ आहे, असं म्हणत वैष्णव यांनी मिथुन चक्रवर्तींचं अभिनंदन केलं. दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मिथुन चक्रवर्ती यांनी आनंद व्यक्त केला असून हा पुरस्कार कुटुंबिय आणि चाहत्यांना समर्पित करत असल्याचं त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<u>आयुष राज्यमंत्री</u>**

विश्वव्यापी आरोग्य पर्यटन क्षेत्रात भारताला विशेष स्थान आहे, असं केंद्रीय आयुष, आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी म्हटलं आहे. आयुष आरोग्य पर्यटन शिखर परिषदेचं उद्घाटन काल मुंबईत जाधव यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. भारताच्या आरोग्यविषयक पर्यटनाचा दृष्टीकोन केवळ शारीरिक आरोग्यापर्यंत मर्यादित नाही, तर त्यामध्ये मानसिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्याचाही समावेश आहे; असं त्यांनी सांगितलं. आयुष मंत्रालय, पर्यटन मंत्रालय आणि  राज्य सरकारनं ही परिषद आयोजित केली आहे.

**<u>सीबीआय</u>**

जगभरातल्या लोकांची सायबर गुन्हेगारीद्वारे फसवणूक करणाऱ्या टोळीत सामील असलेल्या 26 जणांना काल केंद्रिय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआय नं अटक केली. देशभरातल्या विविध 32 ठिकाणी छापे घालून सीबीआय नं सायबर गुन्हेगारीचं हे जाळं उद्ध्वस्त केलं. या प्रकरणी पुण्यातून 10 जणांना अटक करण्यात आली असून पाच जणांना हैदराबादमधून तर 11 जणांना विशाखापट्टणम इथून ताब्यात घेतलं आहे. या छाप्यात इलेक्ट्रॉनिक उपकरणं, मोबाइल फोन, लॅपटॉप, रोख रक्कम यासह अन्य साहित्य सीबीआय नं जप्त केलं. या गुन्हेगारांनी परदेशातल्या, प्रामुख्यानं अमेरिकेतल्या नागरिकांची तांत्रिक सहाय्य सेवा पुरवठादार बनून फसवणूक केली.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि बांग्लादेश दरम्यानच्या कानपूर क्रिकेट कसोटी सामन्याच्या  कालच्या चौथ्या दिवशी बांग्लादेश संघाच्या दुसऱ्या डावात 2 गडी बाद 26 धावा झाल्या. दोन दिवसांनंतर काल खेळ पुन्हा सुरू झाल्यावर बांग्लादेशनं 107 धावांवरून आपला पहिला डाव सुरू केला आणि सर्वबाद 233 धावा केल्या. त्यानंतर भारतानं 9 गडी बाद 285 धावांवर आपला डाव घोषित केला. भारताला पहिल्या डावात 52 धावांची आघाडी मिळाली आहे.

**<u>पावसाळा</u>**

मान्सून अजून भारतातून परतलेला नसला, तरी पावसाळ्याचे अधिकृत चार महीने काल संपले. 1 जून ते 30 सप्टेंबर हा कालावधी पावसाळ्याचा अधिकृत कालावधी समजला जातो. राज्यात दरवर्षी साधारण 994 मिलीमीटर पाऊस पडतो; यंदाच्या पावसाळ्यात राज्यात 1 हजार 252 मिलीमीटर पावसाची नोंद झाल्याचं हवामान खात्याच्या आकडेवारीमधून स्पष्ट होत आहे. राज्यात हिंगोली वगळता इतर सर्व जिल्ह्यांमध्ये सरासरी इतक्या किंवा त्यापेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे.

**<u>हवामान</u>**

सांगली आणि कोल्हापूरमध्ये काल संध्याकाळी वीजांसह जोरदार पाऊस झालं. येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वीजांसह पावसाची शक्यता आहे; विदर्भातही काही ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.